INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No. MH-659/13(N)
www.vmsindia.org

# वारकरी संप्रदाय व श्री पुंडलिक

**अनिता देशमुख**
मराठी विभाग प्रमुख, प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय,वर्धा
Email – avdeshmukh4@gmail.com

**सारांश –**
वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवनातील एक महत्त्वपूर्ण संप्रदाय आहे. या संप्रदायाचे उपास्य दैवत श्री विठ्ठल आहे आणि प्रधान केंद्र पंढरपूर आहे. पंढरपूर हे गाव अतिशय प्राचीन असून ते भीमा नदीच्या तीरावर वसले आहे. भीमा नदीच्या तीरावर पुंडलिकाची समाधी आहे व श्री विठ्ठलाची स्थापना केलेली आहे यामुळे श्री विठ्ठल, पंढरपूर आणि पुंडलिक या तिघांचे उल्लेख आणि माहात्म्य वारकरी संप्रदायात दिसून येतात. श्री विठ्ठल हा देव, पुंडलिक हा भक्त, भीमानदी हे तीर्थ आणि पंढरपूर हे क्षेत्र अशा पद्धतीने देव, भक्त, तीर्थ आणि क्षेत्र हे चारही घटक वारकरी संप्रदायाच्या इतिहासात आढळतात. पुंडलिकाचे सर्व वारकरी संतांनी उल्लेख केले आहेत व माहात्म्यही सांगितले आहे. पुंडलिक विषयक अनेक कथाही आहेत या कथांमधून पुंडलिकाची विठ्ठलावरील भक्ती स्पष्ट झाली आहे. म्हणून पुंडलिकाचा उल्लेख सर्व वारकरी संत 'भक्तराज' या नावाने करतात व विठ्ठलाचा उल्लेख 'पुंडलिक वर दे श्री हरि विठ्ठल' असा करतात. विठ्ठलाला पंढरपुरात आणणाऱ्या पुंडलिकाची समाधी भीमा तीरी होती व पुंडलिकामुळे विठ्ठल पंढरपुरला आला असे नामदेव महाराज नमूद करतात. पंढरपूर याचे एक नाव पुंडलिक क्षेत्र असेही शिलालेखात आले आहे. व्यक्तीला व वारकऱ्यांना सर्वतोपरीने शिस्त लावण्याचा प्रयत्न पुंडलिकाने केला आहे. शके ११५६ च्या संस्कृत कन्नड शिलालेखात पुंडलिकाचा स्पष्ट उल्लेख आहे. या शिवाय आद्य शंकराचार्य यांनी 'पांडुरंगाष्टक' संस्कृत मध्ये लिहिले आहे त्यात पुंडलिकमुनीला वर देणारा विठ्ठल असा पुंडलिकाचा उल्लेख आहे. अशा प्रकारे विठ्ठल व पुंडलिकाचे माहात्म्य सर्व वारकरी संतांनी सांगितले आहे.

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवनातील एक महत्त्वपूर्ण संप्रदाय आहे. महाराष्ट्रात महानुभाव, दत्त, चैत्यन्य, अवधूत, रामदासी, नागेश इ. अनेक संप्रदाय आहेत. पण या सर्व संप्रदायापेक्षाही वारकरी संप्रदाय हा विशेष प्रसिद्ध आहे. हा संप्रदाय 'भागवतधर्म' या नावानेही प्रसिद्ध आहे. या संप्रदायाचे उपास्य दैवत श्री विठ्ठल आहे आणि प्रधान केंद्र पंढरपूर आहे. या शिवाय पैठण, देहू, आळंदी व वारकरी संतांची स्थानेही वारकरी संप्रदायात मोडत असली तरी या संप्रदायाचे प्रधान स्थान व क्षेत्र पंढरपूर हे आहे.

पंढरपूर हे गाव अतिशय प्राचीन असून ते भीमा नदीच्या तीरावर वसले आहे. भीमा नदीच्या तीरावर पुंडलिकाची समाधी आहे व श्री विठ्ठलाची स्थापना केलेली आहे यामुळे श्री विठ्ठल, पंढरपूर आणि पुंडलिक या तिघांचे उल्लेख आणि माहात्म्य वारकरी संप्रदायात दिसून येतात. श्री विठ्ठल हा देव, पुंडलिक हा भक्त, भीमानदी हे तीर्थ आणि पंढरपूर हे क्षेत्र अशा पद्धतीने देव, भक्त, तीर्थ आणि क्षेत्र हे चारही घटक वारकरी संप्रदायाच्या इतिहासात आढळतात. त्यामुळे भारत वर्षाचे धार्मिक व सांस्कृतिक जीवन शतकानुशतके ज्यांनी नामरुपाला आणले अशा तीर्थस्थानांमध्ये पंढरपूरचा समावेश झालेला आढळतो.

पण पंढरपूर येथील वारकरी संप्रदाय केवळ पुराणातून सांगितलेला व धर्मग्रंथातून प्रतिपादन केलेला इतिहासकालीन संप्रदाय नाही तर तो वर्तमानकालीन संप्रदाय आहे. शिवाय तो अतिशय नावीन्यपूर्ण आहे. भारत वर्षात काही तिर्थस्थाने शैव आहेत तर काही वैष्णव आहेत पंढरपूरचे वैशिष्ट्य असे की, तो केवळ शैव किंवा वैष्णवपर नाही तर तो शैव व वैष्णव दोहोंचाही आहे. तसेच श्रीकृष्णाच्या नावावर असणारे अनेक संप्रदाय भारत वर्षात आहेत बंगाल मधील चैतन्य प्रभूंचा भक्तिसंप्रदाय हा श्रीकृष्ण भक्तीचे स्वरुप सांगणारा आहे. वल्लभाचार्यांचा भक्तिसंप्रदाय श्रीकृष्णभक्तीपरच आहे. गुजरात व वृंदावनामध्ये राधा-कृष्णाची पूजा मोठ्या प्रमाणावर होते. पण श्रीकृष्णाला विठ्ठल म्हणून मानणारा व त्याची भक्ती करणारा विठ्ठल भक्तीचा वारकरी संप्रदाय हा केवळ महाराष्ट्रातच आहे. म्हणजेच विठ्ठल हा कृष्णरुप आहे व कृष्ण हा विठ्ठलरुप आहे. हे पंढरपुरच्या वारकरी संप्रदायाचे परम वैशिष्ट्य आहे.

वारकरी संप्रदायात श्रीकृष्णाची विठ्ठलरुपात उपासना होते पण एवढ्यावरच वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य संपत नाही तर या पंथात विठ्ठल पंचक आहे. श्री विठ्ठल, राधा, रुख्मिणी, गरुड व हनुमंत असे पाच मिळून विठ्ठल पंचक होते. हिंदुस्थानात जे जे श्रीकृष्ण भक्तीचे पंथ आहेत त्यामध्ये श्रीकृष्ण आणि राधा यांचे भजन-पूजन होते याचा प्रत्यय आपल्याला वृंदावनात येतो. परंतु श्रीकृष्णभक्तिपर अनेक संप्रदाय असूनही श्रीकृष्ण आणि रुख्मिणीची पूजा कुठेही होत नाही महाराष्ट्रात जो वारकरी संप्रदाय आहे त्यात मात्र विठ्ठलासह रुख्मिणी असते. याशिवाय विठ्ठल भक्तीचे एक वेगळे रुप येथे प्रगट झाले आहे ते म्हणजे येथे विठ्ठलाबरोबर राधाही आहे. या राधेचा उल्लेख राही किंवा राई या नावाने येतो.

अशा प्रकारे राधा, विठ्ठल, रुख्मिणी हे तिघेही एकत्र केवळ वारकरी संप्रदायात आहेत व त्यांच्या बरोबर त्यांचे सेवक गरुड व हनुमंत आहेत. असे हे विठ्ठल पंचायतन आहे. या पाच जणांची उपासना फक्त वारकरी संप्रदायात आहे. अशा या पाच जणांचे भजन-पूजन ज्याच्यामुळे सुरु झाले तो पुंडलिक आहे.

पुंडलिकाचे सर्व वारकरी संतांनी उल्लेख केले आहेत व माहात्म्यही सांगितले आहे. पुंडलिक विषयक अनेक कथाही आहेत या कथांमधून पुंडलिकाची विठ्ठलावरील भक्ती स्पष्ट झाली आहे. म्हणून पुंडलिकाचा उल्लेख सर्व वारकरी संत 'भक्तराज' या नावाने करतात व विठ्ठलाचा उल्लेख 'पुंडलिक वर दे श्री हरि विठ्ठल' असा करतात. एवढी देव व भक्त यामध्ये एकरुपता आहे. देव व भक्ताची एकरुपता हा वारकरी संप्रदायाचा विशेष आहे व तो पुंडलिक कथेमधूनही आला आहे. पण त्याही पेक्षा पुंडलिक व विठ्ठल याचे परस्पर संबंध तपासत असताना काही प्रश्न निर्माण होतात.

पहिला प्रश्न असा की, पुंडलिकाने पंढरपूर येथे केवळ विठ्ठलाची स्थापना केली की, विठ्ठल पंचायतनाची स्थापना केली ?

दुसरा प्रश्न असा आहे की, विठ्ठल हा कर्नाटकातील आहे म्हणजेच कर्नाटकात विठ्ठलाची पूजा व उपासना होती तिच पुंडलिकाने पंढरपूरात केली आहे काय?

तिसरा प्रश्न असा आहे की, पुंडलिक हा ऐतिहासिक आहे की, काल्पनिक आहे? व तो ऐतिहासिक असेल तर त्याने विठ्ठलाची स्थापना केव्हा केली. याशिवाय

चौथा प्रश्न असा आहे की, तो ज्ञानदेव व नामदेवाच्या अगोदर केव्हा होऊन गेला ?

कारण ज्ञानदेव व नामदेव या दोघांनीही आपल्या रचनेतून पुंडलिकाचे माहात्म्य सांगितले आहे. या दिशेने प्रयत्न केला असताना पुंडलिक ते ज्ञानदेव या दरम्यानचा जो वारकरी संप्रदाय होता त्याचा इतिहास बघावा लागतो. सुदैवाने या दृष्टीने माहिती देणारा पुरावा उपलब्ध आहे. भक्त शिरोमणी नामदेव महाराज यांनी विठ्ठलाची आरती लिहिली आहे. त्या आरतीत पुंडलिक ते ज्ञानदेव दरम्यानचा सर्व इतिहास व त्याचा तपशील आढळतो ती आरती अशी

''युगे अठ्ठावीस विटेवरी उभा''
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा
पुंडलिकाचे भेटी परब्रम्ह आले गा
चरणी वाहे भीमा उध्दरी जगा ।।१।।
जय देव जय देव जय पांडुरंगा
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जीवलगा ।।

नामदेव विरचित या आरतीत विठ्ठलाच्या गुण वर्णनाचे चित्रण आहेच पण त्याच बरोबर समग्र वारकरी संप्रदायाचा इतिहासही नामदेव महाराजांनी अनायासे सांगितला आहे. त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, श्री विठ्ठल, राई, रुख्मिणीसह असून त्यांच्या समोर गरुड व हनुमंत आहेत. म्हणजेच नामदेवाच्या वेळी राधा, विठ्ठल, रुख्मिणी व त्यांच्या समोर हात जोडलेले गरुड हनुमंत अशा पाच मूर्ती पंढरपुरला होत्या. त्याशिवाय विठ्ठलाला पंढरपुरात आणणाऱ्या पुंडलिकाची समाधी भीमा तीरी होती व पुंडलिकामुळे विठ्ठल पंढरपुरला आला असे नामदेव महाराज नमूद करतात.

विठ्ठलाची पूजा-अर्चा कर्नाटकात होत होती व त्याची अनेक मंदिरेही तिकडे होती परंतु पंढरपूर येथील विठ्ठलाचे स्थान मात्र पुंडलिकामुळे निर्माण झाले. म्हणजेच विठ्ठल मूर्तीची स्थापना व मंदिराची उभारणी पुंडलिकाने केली असे नामदेव महाराज सांगतात. याशिवाय ते असेही म्हणतात की, पुंडलिकाने ज्या स्थानी विठ्ठलाची स्थापना केली ते स्थान पंढरपूर या नावाने प्रसिध्द होते व आजही आहे.

पंढरपूर याचे एक नाव पुंडलिक क्षेत्र असेही शिलालेखात आले आहे. पंढरपुरला जो चौऱ्यांशीचा सुप्रसिध्द शिलालेख आहे त्या शिलालेखात रामचंद्रदेव यादव याचा उल्लेख केला असून त्याला 'पांडरीफड मुख्य' असे संबोधिले आहे. या शिलालेखाचा काळ ११९८ (अकराशे अठ्यान्नव) असा आहे. स्वतःला श्रीकृष्णाचे वंशज म्हणविणारे देवगिरीतील यादव कुळातील राजे पंढरपुरच्या विठ्ठलाचे परमभक्त होते.

देवगिरीच्या यादवा प्रमाणे कर्नाटकात होयसळ वंशाचे राजे होते. हे देखील स्वतःला श्रीकृष्णाचे वंशज समजत ते सुध्दा देव दर्शनासाठी पंढरपुरला येत असत.

पंढरपुरच्या मंदिरात शके ११५६ (अकराशे छप्पन) चा शिलालेख आहे हा शिलालेख संस्कृत कन्नड अशा मिश्र भाषेत आहे. या लेखात कर्नाटकाच्या होयसळ वंशातील राजाने पंढरपुरची यात्रा केल्याचा उल्लेख असून त्यामध्ये पुंडलिकाचा उल्लेख येतो.

पंढरपुरचा विठ्ठल सर्वत्र व्यापक असा देव आहे. अशा या विठ्ठलाची स्थापना भीमा नदीच्या तीरावर पंढरपूर या तीर्थक्षेत्रात पुंडलिकाने केली आणि तेव्हा पासून पंढरपुरचा वारकरी संप्रदाय उदयाला आला.

पंढरपुरला पुंडलिकाने सुरु केलेल्या उपासनेचे स्वरुप असे आहे की, देव हा कोण्या एका व्यक्ती पुरता मर्यादित नाही तो सर्वांसाठी आहे. म्हणून आजही विठ्ठल भक्त थेट विठ्ठलाच्या पायावर डोक ठेवून त्याचे दर्शन घेऊ शकतो हे दर्शन भक्ताला अहोरात्र मोकळे आहे. दुसरे असे की, भक्ताने देव दर्शनासाठी पंढरपुरला यावे याला वारकरी पंथामध्ये 'वारी' असे नाव आहे. ही वारी एकादशी तिथीला करावी त्यासाठी चार एकादशांची निवड केली आहे.

१) चैत्रशुद्ध एकादशी
२) आषाढ शुद्ध एकादशी
३) कार्तिक शुद्ध एकादशी
४) माघ शुद्ध एकादशी

यापैकी आपल्या सोयीनुसार भक्ताने आपला क्रम सुरु ठेवावा. या वारीचा विधी अतिशय साधा, सोपा आहे. 'ज्ञानेश्वरी' किंवा 'तुकाराम गाथा' यावर हात ठेवून वारकऱ्याने निश्चय करावा. मांसभक्षण, अपेय पान करु नये गळ्यात तुळशीची माळ घालावी व एकादशीचा उपवास करुन नामसंकीर्तनात दिवस घालवावा. पंढरपुरला गेल्यावर भीमा नदीत स्नान करुन देवदर्शन व नगरप्रदक्षिणा करावी व रात्री कीर्तनात भाग घ्यावा हा वारीचा साधा नियम आहे हे सर्व नियम स्वयंसिध्द आहेत. हे नियम वारकऱ्याने आपणहून पाळायचे असतात.

अशा प्रकारे व्यक्तीला व वारकऱ्यांना सर्वतोपरीने शिस्त लावण्याचा प्रयत्न पुंडलिकाने केला आहे. तेव्हा पासून ते ज्ञानदेव काळापर्यंत वारकरी पंथाची जडण-घडण होऊन वारकरी संप्रदाय नावारुपाला आला.

वारकरी संप्रदायात पुंडलिक ते ज्ञानदेव हा अतिशय महत्त्वाचा कालखंड आहे. ज्ञानेश्वरांनी शके १२१२ मध्ये ज्ञानेश्वरी पूर्ण केली. शके १२१२ पासून ज्ञानेश्वर, नामदेवाच्या कार्याचा प्रारंभ आहे तर पुंडलिक ज्ञानदेव काळाची ती उत्तर सीमा आहे. यावरुन ज्ञानदेव, नामदेवाच्या काळी वारकरी संप्रदाय नामरुपाला येऊन परिपूर्ण अवस्थेला आला होता. याचा प्रत्यय नामदेव विरचित आरतीतही येतो. म्हणजे वारकरी पंथाच्या पुंडलिक, ज्ञानदेव काळाची उत्तरावस्था निश्चित झाली. परंतु, हा पुंडलिक केव्हा झाला हे मात्र पाहिले पाहिजे.

शके ११५६ च्या संस्कृत कन्नड शिलालेखात पुंडलिकाचा स्पष्ट उल्लेख आहे. या शिवाय आद्य शंकराचार्य यांनी 'पांडुरंगाष्टक' संस्कृत मध्ये लिहिले आहे त्यात पुंडलिकमुनीला वर देणारा विठ्ठल असा पुंडलिकाचा उल्लेख आहे. शंकराचार्यांचा कालखंड शके ७२० ते ७४० असा आहे. ज्या अर्थी शंकराचार्य पुंडलिकाचे वर्णन करतात त्या अर्थी पुंडलिक शंकराचार्यांच्या पूर्वी होता हे स्पष्ट होते. त्याच प्रमाणे ११५९ (अकराशे एकोणसाठ) चा जो शिलालेख आहे त्यात ''भीमरथी नदीतीर संनिनिष्ट पंडरग नामान महाग्रामधेवसते पुंडरिक मुनिमनः कुमुदाविकास सुधारकररावो भगवते स्त्री विठ्ठले'' या शिलालेखात भक्तराज पुंडलिकाचा स्पष्ट उल्लेख आहे.

पंढरपुरला जे शिलालेख आहेत ते सर्व श्री विठ्ठलाशी संबधित आहेत या सर्व शिलालेखांचे संपादन वि. वा. राजवाडे, ग. ह. खरे, डॉ. शं. गो. तुळपुळे या विद्वानांनी केले आहे.

१) शके १०११ चा शिलालेख
२) शके ११५९ चा शिलालेख
३) शके ११९२ चा शिलालेख
४) शके ११९५ ते ९९ मधील चौऱ्यांशीचा शिलालेख
५) शके १२३३ चा शिलालेख

हे सर्व शिलालेख विठ्ठल मंदिरातच कोरलेले आढळतात. या शिवाय ताम्रपटातून आणि काही उत्कीर्ण लेखातूनही जी माहिती उपलब्ध होते त्यावरुन श्री विठ्ठल, वारकरी, पुंडलिक यांच्या विषयीचा इतिहास हळूहळू उलगडत जातो.

विठ्ठल हा पंढरपुरला कसा आला हे सर्व संतांनी श्रध्देने व भक्तीने सादर केले सर्व प्रथम ज्ञानेश्वरांचे वडिल बंधू श्री निवृत्तीनाथ महाराज यांनी पंढरपूर माहात्म्यावर अभंग लिहिले पंढरपुरवर रचना करणारे रचनाकार निवृत्तीनाथ आहे. पुढे ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, निळोबा पिंपळनेरकर यांनी निवृत्तीनाथांचा कित्ता गिरवला. या सर्व संताचे अभंग बघितले तर पुढील बाबी स्पष्ट होतात.

१) श्री विठ्ठल

२) रुख्मिणीसह विठ्ठल

३) पुंडलिकामुळे विठ्ठलाचे आगमन

४) भीमा चंद्रभागा तीर व तेथील संतांचा कीर्तन सोहळा

५) कृष्ण रुपाने पंढरपुरला गोप व गायीसह देवाचे आगमन व कृष्णाचे वेणूवादन, श्रीकृष्णाने केलेला गोपालकाला इ.

अशा प्रकारे विठ्ठल व पुंडलिकाचे माहात्म्य सर्व वारकरी संतांनी सांगितले आहे. या माहितीवरुन एक गोष्ट निष्पन्न होते की, विठ्ठल आणि पुंडलिक या दोहोंमुळे पंढरपूर हे क्षेत्र उदयाला आले. पुंडलिक मुनीच्या तपाने देव प्रसन्न झाला व विठ्ठल रुपाने प्रगटला ही धारणा सर्व वारकरी संतांची आहे. एवढेच नव्हे तर विठ्ठलाचे बिरुद सांगतांना 'पुंडलिक वर दे हरि विठ्ठल' असे म्हणतात.

पुंडलिकाला वर देणारा विठ्ठल आहे असे सर्व संत एकमताने बोलतात व पुंडलिकामुळे विठ्ठलाची भक्ती आम्हाला प्राप्त झाली व पुंडलिक हा भक्त आहे या मधून एका बाजूने देव, भक्त तर दुसऱ्या बाजूने तीर्थ आणि क्षेत्र यांचे माहात्म्य वारकरी संतांनी सांगितले आहे.

निवृत्तीनाथादी संतमंडळींच्या पंढरपूरवरील रचना व नामदेव विरचित आरती समोरा-समोर ठेवली तर आपल्याला विठ्ठल विषयक पुढील महत्त्वपूर्ण बाबी कळतात त्या अशा -

१) श्री विठ्ठल हा राधा-रुख्मिणीसह आहे.

२) तो समचरणी असून त्याची दृष्टी अदोमुख आहे आणि कमरेवर हात ठेवलेले आहेत.

३) त्याच्या मस्तकावर शिवलिंग आहे आणि कानामध्ये मकरकुंडल आहेत.

मकरकुंडलाचा उल्लेख सर्व संतांनी आपल्या अभंगात केला आहे. मकरकुंडलाच्या उल्लेखावरुन विठ्ठल हा विष्णूचे रुप आहे आणि त्याचा थेट संबंध विष्णुच्या मत्स्य अवताराशी आहे. शिवाय तो योगी आहे. समचरण दृष्टी नासाग्री असणे, कमरेवर हात ठेवणे आणि अभंग रुपात उभे राहणे ही योगमुद्रा आहे.

४) विठ्ठलाच्या समोर गरुड व हनुमंत हे त्याचे सेवक आहेत. राधा, रुख्मिणी, गरुड, हनुमंतासह असलेल्या विठ्ठलाचे हे पंचक नामदेवांनी सांगितले त्याच बरोबर नामदेव महाराज असे सांगतात की, तो पुंडलिकासाठी आलेला आहे.

अशा प्रकारे विठ्ठल व पुंडलिकाचे माहात्म्य सर्व वारकरी संतांनी सांगितले आहे. या माहितीवरुन एक गोष्ट निष्पन्न होते की, विठ्ठल आणि पुंडलिक या दोहोंमुळे पंढरपूर हे क्षेत्र उदयाला आले. पुंडलिकमुनीच्या तपाने देव प्रसन्न झाला व विठ्ठल रुपाने प्रगटला ही धारणा सर्व वारकरी संतांची आहे.

एवढेच नव्हे तर विठ्ठलाचे बिरुद सांगतांना वारकरी 'पुंडलिक वर दे हरि विठ्ठल' असे म्हणतात. पुंडलिकाला वर देणारा विठ्ठल आहे असे सर्व संत एकमताने बोलतात व पुंडलिकामुळे विठ्ठलाची भक्ती आम्हाला प्राप्त झाली. पुंडलिक हा भक्त आहे या मधून एका बाजूने देव, भक्त तर दुसऱ्या बाजूने तीर्थ आणि क्षेत्र यांचे माहात्म्य वारकरी संतांनी सांगितले आहे.

निवृत्तीनाथादी संतमंडळींच्या पंढरपूरवरील रचना व नामदेव विरचित आरती समोरा-समोर ठेवली तर आपल्याला विठ्ठल विषयक पुढील महत्त्वपूर्ण बाबी कळतात त्या अशा -

१) श्री विठ्ठल हा राधा-रुख्मिणीसह आहे.

२) तो समचरणी असून त्याची दृष्टी अदोमुख आहे आणि कमरेवर हात ठेवलेले आहेत.

३) त्याच्या मस्तकावर शिवलिंग आहे आणि कानामध्ये मकरकुंडल आहेत.

कमरकुंडलाचा उल्लेख सर्व संतांनी आपल्या अभंगात केला आहे. मकरकुंडलाच्या उल्लेखावरुन विठ्ठल हा विष्णूचे रुप आहे आणि त्याचा थेट संबंध विष्णुच्या मत्स्य अवताराशी आहे शिवाय तो योगी आहे. समचरण दृष्टी नासाग्री असणे, कमरेवर हात ठेवणे आणि अभंग रुपात उभे राहणे ही योगमुद्रा आहे.

४) विठ्ठलाच्या समोर गरुड व हनुमंत हे त्याचे सेवक आहेत. राधा, रुख्मिणी, गरुड, हनुमंतासह असलेल्या विठ्ठलाचे हे पंचक नामदेवांनी सांगितले त्याच बरोबर नामदेव महाराज असे सांगतात की, तो पुंडलिकासाठी आलेला आहे.

अशा प्रकारे वारकरी संतांनी लिहिलेल्या पंढरी माहात्म्यपर अभंगरचना व नामदेवाची आरती या मधून पुंडलिकासाठी विठ्ठल कसा आला हे स्पष्ट होते आणि त्याच बरोबर हे ही कळून चुकते की, पुंडलिक हा वारकरी संप्रदायाचा मूळ प्रवर्तक आहे.

## संदर्भ सूची

१) आरती संग्रह - पांडुरंगाची आरती - अमोल पब्लिकेशन पुणे, ३०, नवीन आवृत्ती १९९८

२) डॉ. शोभना गोखले, महाराष्ट्राची सत्वधारा मधील पंढरपूर लेख, आवृत्ती दुसरी, दास्ताने रामचंद्र प्रकाशन पुणे.

३) डॉ. शं. गो. तुळपुळे, संपादक, प्राचीन मराठी कोरीव लेख, आवृत्ती पहिली इ.स. १९६३, पुणे विद्यापीठ, पुणे.

४) डॉ. म. रा. जोशी, मराठी संशोधन पत्रिका, सप्टेंबर १९७९

५) डॉ. वा. वि. मिराशी, संपादक, शिलाहार राजवंशाचा इतिहास, विदर्भ संशोधन मंडळ नागपूर, आवृत्ती पहिली.